



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे



दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587


वर्ष ५ ▪ अंक १६१ ▪ गुरुवार १२ मार्च २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

### काँग्रेसचे कार्यध्यक्ष चंद्रकांत भंडारी याच्याकडून

## राजेंद्र गांधींना हनी ट्रॅपमध्ये अडकविण्याची धमकी

**कोतवाली पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** नगर अर्बन बँकेतील घोटाळयांवर आवाज उठविणारे आणि सर्व सामान्य नागरिकांना त्यांचे बँकेतील पैसे परत मिळवुण देण्यात महत्वाची भुमिका बजावणाऱ्या राजेंद्र गांधी यांना आता राजकीय वलय असलेल्या काँग्रेसचे कार्याध्यक्ष चंद्रकांत तथा बाळू रतनचंद भंडारी यांने हनीट्रॅपमध्ये अडकविण्याची धमकी दिली आहे. तसेच व्हॉटसअपवर वेगवेगळे मेसेज पाठवून बदनामीचीही धमकी दिली आहे. त्यामुळे भंडारी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्त असे की, राजेंद्र गांधी यांचा नवीपेठ येथे कापड विक्रीचा व्यवसाय असून ते गेल्या अनेक वर्षांपासून नगर अर्बन बँकेतील घोटाळयांवर आवाज उठविला आहे. त्यामुळे पोलिस ठाणयात गुन्हा दाखल होऊन अनेक संचालकांसह अर्बनच्या अधिकाऱ्यांनाही जेलची हवा खावी लागली आहे. त्यापैकी जितेंद्र गांधी हा बाळू भंडारी याचा हा जवळचा नातेवाईक असल्याने त्याचा मनात राग धरुन भंडारी याने गेल्या काही दिवसांपासून सोशल मिडीयावर राजेंद्र गांधी यांची बदनामी करण्याचा व हनी ट्रॅपमध्ये अडकविण्याची धमकी देणारे मेसेज पाठविले जात आहे. तसेच जैन धर्मशाळा या धर्मदाय संस्थेच्या ग्रुपवर जैन धर्मशाळा या संस्थेत मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप केला आहे. तो भ्रष्टसराचा हा राजेंद्र गांधी यांनी केला असल्याचा आरोप करताना भंडारी यांनी कोणतेही पुरावे दिले नाही.

**चंद्रकांत भंडारीचा मोबाईल ताब्यात घेतल्यास हनी ट्रॅपमधील ती महिलाही निष्पन्न होईल**

**बाळू भंडारी याच्याकडून हनी ट्रॅपमध्ये अडकविण्याची धमकी दिली जात असल्यास त्याचे मोबाईल पोलिसांनी ताब्यात घ्यावे या प्रक्रीयेत कोणती महिता त्यांच्या संपर्कात आहे याचा ही पोलिसांनी छडा लावल्यास याचे मोठे रॅकेट उघड होऊ शकते. त्यामुळे पोलिस कोणती भुमिका घेतात याकडे लक्ष लागले आहे.**

दरम्यान याप्रकरणी राजेंद्र गांधी यांनी आज (दि.१२) पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी भेट घेऊन कारवाई करणची विनंती केल्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणयात आले. त्यानुसार आज चंद्रकांत उर्फ बाळू भंडारी याच्या विरुध्द हनी ट्रॅपमध्ये अडकविण्याची व सोशल मिडीयाव बदनामी केल्याचा गुन्हा दखल करण्यात आला आहे.

### अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील कुळांना, मालमत्ता धारक

## भाड्याच्या उत्पन्नावर आकारणी न करता क्षेत्रफळानुसार आकारणी करा

**शिवसेनेचे मनपा आयुक्त यांना निवेदन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारत व जमिनीचे पुर्नमुल्यांकण करणेकामी मे. सि.ई. इन्फो सिस्टीम लि. या संस्थेची नियुक्ती केली होती. त्यानुसार सदरील संस्थेने पुर्नमुल्यांकण केलेले आहे. सदर मुल्यांकन करताना महानगरपालिकेने भाडेकरी देत असलेल्या भाड्यावर कर आकारणी करीता कर योग्य मुल्य निश्चित केलेले असून त्यानुसार कुळांना (मालमत्ताधारक) नोटीसा पाठविलेल्या आहेत.

अहिल्यानगर शहरातील मालमत्ता धारकाचे एक उदाहरण म्हणून तळ मजला, ३ रुम व पहिल्या मजला ३ रुम असे एकुण आर.सी.सी. बांधकाम असलेले ६० चौ.मी. क्षेत्रफळाचे घर हे फक्त निवासी वापरासाठी असल्यास शहरामध्ये असलेल्या दरानुसार त्याचे करयोग्य मुल्य रक्कम रु. ६०००/- येत आहे. त्यानुसार सदरील मालमत्ता धारकाला ४३ टक्के सर्व प्रकारचे कर व घनकचरा कर रु. ४८०/- असे एकुण ३०६०/- घरपट्टी आकारणी केली जाते. परंतु सदर मालमत्ताधारक तळमजला तीन रुम स्वतः वापरतो व पहिला मजला तीन रुम रु. १०,०००/- महिना भाड्याने स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी दिलेला आहे. या पहिल्या मजल्यावरील तीन रुमच्या भाड्यानुसार वार्षिक कर योग्य मुल्य हे रु. १,०८,०००/- इतके महानगरपालिका घरपट्टी आकारणीकरीता निश्तीत करते, तसेच त्यामध्ये तळ मजल्यावरील तीन रुमचे कर योग्य मुल्य रु. ३०००/- समाविष्ट करुन एकुण करयोग्य मुल्य रु. १,११,०००/- वर ४३ टक्के कर व घनकचरा कर रु. ४८०/- असे एकुण ४८०००/- इतकी घरपट्टी आकारणी केली जाते. यामुळे मालमत्ता धारकाचे उत्पन्नाचे साधन म्हणून तयार केलेल्या घरापासून त्याच्यावर मोठ्याप्रमाणात कर आकारणी होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

अहिल्यानगर शहरामध्ये ▪ पान ४ वर

## ठाकरे शिवसेनेच्या वतीने स्व. अनिलभैय्या राठोड यांना जयंती दिनी अभिवादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील तळागाळातील सर्वसामान्य माणसाच्या गळ्यातली ताईत असणारे स्व. अनिलभैय्या राठोड यांच्या ७६ व्या जयंती निम्मित चितळे रोड येथील शिवालयात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी मनोज गुंदेचा, विलास उबाळे, राजेंद्र दळवी, प्रतीक बारसे, शंकर आव्हाड, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, अनिस चुडीवाला, किशोर कोतकर आदींसह पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी शिवसैनिकांनी स्व. राठोड यांच्या आठवणींना उजाळा दिला. स्व.अनिलभैय्या आज हयात नाहीत. मात्र आजही ते आपल्यात आहेत अशी अनुभूती कायम सामान्य माणसांना मिळत असते. सर्वसामान्यांच्या हिताच्या रक्षणासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. स्व. अनिलभैय्या यांच्या नसण्याची उणीव समस्त नगरकारांच्या मनाला आजही अस्वस्थ करणारी आहे. शिवसेना ही स्व.अनिलभैय्या यांनी दाखवलेल्या सर्वसामान्य जनतेसाठी काम करण्याच्या विचारांवर कायम काम करीत राहील. सर्वसामान्य माणसाने रात्री अपरात्री केव्हाही अनिलभैयांना फोन केला तरी त्यांच्या मदतीला ते तत्परतेने धावून जायचे. आपण फोन केला तर तो फोन उचलला जाईल आणि भैय्या लगेच उपस्थित होतील असा विश्वास सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये होता. अनिलभैय्या आपल्यात नसण्याची एक पोरकेपणाची भावना नगरकरांच्या मनामध्ये आहे. ▪ पान ४ वर

**स्व. अनिल भैय्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिवसैनिकांचे काम : काळे**

**स्व. अनिलभैयांनी कधीही कोणाला त्रास दिला नाही. खुनशी, द्वोषाचे राजकारण केले नाही. या शहरातील व्यापारी, उद्योजक, हातगाडीवाला, फेरीवाला, भाजीवाला अशा प्रत्येक घटकाच्या ते कायम पाठीशी उभे राहिले. त्यांनी कायम दहशतीच्या विरोधात संघर्ष करत या शहराला संरक्षण देण्याचे काम केले. स्व.अनिलभैय्या यांच्यामुळे नगर शहरातील सामान्य जनतेची पिळवणूक करणाऱ्या, दहशत करणाऱ्या घटकांवरती मोठा वचक होता. तोच वचक ठाकरे शिवसेनेच्या माध्यमातून कायम ठेवण्याचे काम आज त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत शिवसैनिक करीत असल्याचे प्रतिपादन, महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे.**

## छोट्या व्यावसायीकांना गॅस सिलेंडर तात्काळ मिळवून देण्याची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**


(छाया : जाकिर शेख)

**अहिल्यानगर–** छोट्या व्यावसायीकांना गॅस सिलेंडर तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे आणि गॅस सिलेंडरच्या किमती कमी करण्यात याव्यात या मागणीसाठी छोटया व्यावसायीकांनी आज (दि.१२) जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

केंद्र सरकारने एलपीजी गॅसच्या किमती वाढविल्या आहेत. त्यामुळे एका गॅस टाकीसाठी ९०० रुपये मोजावे लागत आहे. सिलेंडर बुक करण्याचा कालावधी १५ दिवसांऐवजी आता १ महिन्याचा करण्यात आला आहे. व्यावसायीक गॅसच्या किमती १९०० रुपयांपर्यंत गेल्या आहेत. तसेच सिलेंडचे रेशनिंग करण्यात ▪ पान ४ वर

## महिला नगरसेविकांनी प्रभागात जनजागृतीसाठी पुढाकार घ्यावा - महापौर ज्योतीताई गाडे

**। अहिल्यानगरमध्ये राष्ट्रीय एचपीव्ही लसीकरण विशेष मोहिमेचा शुभारंभ**
**। बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते उद्घाटन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे राष्ट्रीय एचपीव्ही लसीकरण विशेष मोहिमेचा शुभारंभ महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, कॅन्सर हा आजार महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. गर्भाशय मुखाचा कर्करोग हा संसर्गामुळे होणारा गंभीर आजार आहे. भारतात महिलांमध्ये स्तन कर्करोगानंतर गर्भाशय मुखाचा कर्करोग दुसऱ्या क्रमांकावर आहे. आपल्या देशात २०२४ मध्ये या कर्करोगाचे सुमारे ७८ हजार नवीन रुग्ण आढळले असून त्यापैकी ४२ हजार महिलांचा मृत्यू झाला आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू केली असून गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रतिबंध करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. महापालिकेच्या महिला नगरसेविकांनी आपल्या प्रभागामध्ये पुढाकार घेऊन समाजामध्ये जनजागृती करावी आणि मुलींचे लसीकरण करून घ्यावे. प्रतिबंध हा उपचारापेक्षा श्रेष्ठ असतो. ही लस महापालिकेच्या माध्यमातून मोफत उपलब्ध आहे, तर खाजगी रुग्णालयांमध्ये यासाठी सुमारे चार हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे सर्वांनी मिळून एचपीव्ही लसीकरणाची विशेष मोहीम यशस्वीपणे राबवावी, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला आयुक्त यशवंत डांगे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर, अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, नगरसेविका मंगल लोखंडे, सुनीता गेनप्पा, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दीपमाला चव्हाण तसेच डॉक्टर, आशा सेविका आणि सिस्टर्स मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, महापालिकेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना ▪ पान ४ वर

### मनपा सहकारी पतसंस्थेकडून

## महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचा सत्कार

**। मनपा कर्मचाऱ्यांची पतसंस्था म्हणजे कामधेनू – महापौर ज्योतीताई गाडे**
**। कर्मचाऱ्यांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यात पतसंस्थेची महत्त्वाची भूमिका**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, अहिल्यानगर महानगरपालिका सहकारी पतसंस्थेला शंभर वर्षांची परंपरा असून या संस्थेच्या माध्यमातून मनपा कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न सोडविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले जात आहे. मनपा कर्मचाऱ्यांची पतसंस्था ही खऱ्या अर्थाने कामधेनू असून संचालक मंडळाच्या माध्यमातून सभासदांचे हित जपले जात आहे. कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणीच्या काळात पतसंस्था मदतीला धावून येते. पारदर्शक कारभारामुळे या संस्थेचा नावलौकिक वाढला असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन विजय कोतकर, व्हाईस चेअरमन किशोर कानडे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल तसेच संचालक शेखर देशपांडे, विकास गीते, सतीश ताठे, अजय कांबळे, बलराज गायकवाड, बाळासाहेब पवार, कैलास चावरे, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, बाळासाहेब गंगेकर, प्रमिलाताई पवार आणि कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी उपस्थित होते.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, मनपा कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने महापौर ज्योतीताई गाडे व माझा सत्कार केल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. महापालिका आणि पतसंस्थेचे कर्मचारी हे शहर विकासाच्या कामात महत्त्वाचा दुवा आहेत. त्यांच्या माध्यमातून शहरातील विविध प्रश्न सोडविण्याचे काम केले जाते. कर्मचाऱ्यांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी पतसंस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ▪ पान ४ वर

# दै. आकर्षण निवडक

## गौरी तिकोणे भरतनाट्यम विशारद पूर्ण

अहिल्यानगर- अखिल भारतीय गांधर्व



महाविद्यालय मंडळाच्या विशारद परीक्षेत गौरी गंगाराम तिकोणे हिने उत्तम गुण संपादन करीत भरतनाट्यम विशारद पूर्ण केल्याची माहिती राधिका भरतनाट्यम अकॅडमीच्या संचालिका कविता भांबरे -घोलप यांनी दिली. गेली १२ वर्ष गौरी भरतनाट्यम शास्त्रीय नृत्य शिकत असून, तिने गीत-रामायण, द्रौपदी वस्त्रहरण, कृष्ण लीला, जटायू मोक्ष, शबरी, भक्त शिरोमणी मीरा अश्या सुंदर नृत्य नाटिकेत विशेष कलाकृती सादर केल्या आहेत, तसेच मेहेर ट्रस्टच्या सेवेत सलग तीन वर्ष सहभाग घेतला. तिला आई सीमा तिकोणे आणि वडिलांचे विशेष सहकार्य लाभले. गायक आदेश चव्हाण आणि मृदंग करीता उत्कर्ष दळवी सरांनी साथ दिली. तर केंद्र प्रमुख अविनाश देऊळगावकर सर यांनी विशेष कौतुक केले आहे.

## पी.जी. इलेक्ट्रोप्लास्ट कंपनीवर कामगार कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप



अहिल्यानगर - येथील पीजी इलेक्ट्रोप्लास्ट लिमिटेड या कंपनीकडून कंत्राटी कामगार कायद्याचा भंग तसेच कामगार कायद्याची मोडतोड केली जात असल्याचा आरोप करत संबंधित कंपनीविरुद्ध न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेना यांच्या वतीने कामगार आयुक्त रेवनाथ बिसले यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात मनसे कामगार सेनेचे चिटणीस चंद्रकांत ढवळे यांनी म्हटले आहे की, कंपनीकडून कंत्राटी कामगारांना कामगार कायद्याप्रमाणे न्याय दिला जात नाही. सर्वोच्च न्यायालयाने २०१८ मध्ये दिलेल्या निकालानुसार कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांप्रमाणेच वेतन व सुविधा देणे बंधनकारक आहे. या निर्णयात न्यायमूर्ती जे. एस. केहर आणि न्यायमूर्ती एस. ए. बोबडे यांच्या खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले होते. त्यानुसार कंत्राटी कामगारांना महागाई भत्ता, बोनस, वैद्यकीय सुविधा तसेच भविष्य निर्वाह निधी देणे आवश्यक आहे. मात्र कंपनीमध्ये सुमारे ६४० ते ७०० कर्मचारी कायमस्वरूपी कार्यरत असून ४५०० ते ५००० कामगार कंत्राटी पद्धतीने काम करत आहेत. तरीही या कंत्राटी कामगारांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## प्रयत्न नर्सिंग महाविद्यालयातील 'लॅम्प लाइटिंग' व शपथविधी सोहळा उत्साहात

अहिल्यानगर- शहरातील गुलमोहर रोडवरील प्रयत्न नर्सिंग महाविद्यालयात प्रथम वर्ष नर्सिंग विद्यार्थ्यांचा लॅम्प लाइटिंग सोहळा व शपथविधी कार्यक्रम नुकताच उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या सोहळ्यास प्रमुख पाहुण्या म्हणून शासकीय परिचारिका महाविद्यालयाच्या प्राचार्या वैशाली कोरडे, श्रीदीप हॉस्पिटलच्या प्रशासक भावना नायर, प्रयत्न नर्सिंग महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. शीतल म्हस्के, महाविद्यालयाच्या प्राचार्या . दीक्षा घाटविसावे, प्रशासक . मीना लाड, तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# उत्सव : नाथपरंपरेमध्ये भगवानगडाला सर्वात महत्वाचे स्थान

### भगवानगडाचे उत्तराधिकारी कृष्णा महाराज शास्त्री यांचे प्रतिपादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचे श्रीगुरु संत जनार्दन स्वामी यांचा जन्म, अनुग्रह आणि नाथांनी आपला देह गंगार्पण केलेली तिथी म्हणजेच फाल्गुन वद्य षष्ठी होय. या विशेष तिथीलाच नाथषष्ठी असे म्हणतात. नाथांच्या जीवनातील महत्त्वाच्या घडामोडी या तिथीलाच घडल्यामुळे त्यांच्या जीवनामध्ये या तिथीला अनन्य साधारण महत्व आहे. नाथांच्या प्रती असलेली कृतज्ञता अभिव्यक्त करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभरातून अनेक साधुसंतांच्या दिंड्या या तिथीला पैठणला येतात. तसेच देशभरातील हजारो भाविकही या दिवशी नाथांच्या दर्शनासाठी येतात. राज्यभरातून आलेल्या दिंड्यांचे प्रमुख पवित्र गोदावरीच्या तीरी आपापल्या फडांमध्ये किर्तन भजनाच्या माध्यमातून भानुदास–एकनाथ नामाचा जयघोष करतात. या सोहळ्यामध्ये भगवानगडाची दिंडीसुद्धा एक महत्त्वाची दिंडी असल्यामुळे वै.श्री संत भगवानबाबांपासून भगवानगडाच्या दिंडीला विशेष मान आहे. भगवानगडाहून निघाल्यापासून हजारो भाविक या दिंडीमध्ये सहभागी झाले होते. दिंडी पैठणमध्ये पोहोचल्यावर फाल्गुन वद्य षष्ठी व सप्तमी हे दोन दिवस भगवानगडाच्या फडामध्ये नाथांच्या नामाचा जयघोष झाल्यानंतर परंपरेप्रमाणे अष्टमीच्या दिवशी ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या आदेशानुसार भगवानगडाचे चतुर्थ उत्तराधिकारी ह.भ.प.श्री. कृष्णा महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने नाथषष्ठी सोहळ्याची सांगता झाली. यावेळी महाराजांनी सांगितले की, अभंग हे नामपर, उपदेशात्मक, स्थितीपर, आदेशपर,



मागणीपर असतात. परंतु गौळण ही भक्ती व प्रेम रसाने परिपूर्ण असते. महाराजांनी काल्याच्या कीर्तनासाठी खालील गौळणीची निवड केली होती.

यातिकुळ माझें गेलें हारपोनी
श्रीरंगा वांचुनी अणू नेंणें ।।१।।
किती वो शिकवाल मज वेळोवेळां ।
मी तया गोवळा रतलिये ।।२।।
अष्टभोग भोगणें माते नाहीं चाड ।
भक्तिप्रेम गोड लेईले गे माये ।।३।।
बापरखुमादेवीवरु जीवींचा जिव्हाळा ।
कांही केलिया वेगळा नव्हे गे माये ।।४।।

काल्याच्या कीर्तनप्रसंगी सदरील गौळणीचे विश्लेषण केल्यानंतर महाराजांनी नाथांच्या जीवन चरित्रालाही उजाळा दिला. यावेळी कृष्णा महाराज शास्त्रीजींनी सांगितले की, श्री संत एकनाथ महाराज हे श्री संत भानुदास महाराज यांचे पणतू होय. श्री भानुदास–चक्रपाणी–सूर्यनारायण–श्री एकनाथ महाराज अशी परंपरा आहे. मूळ नक्षत्रावर जन्म असल्याने बालपणीच आईवडील निवर्तले, असे महाराजांचे स्वतःचे म्हणणे आहे. मुळीच्या मुळी या अभंगातून ते बोलतात. महाराजांचं घराणं अतिशय पवित्र असून, परंपरेने विठ्ठलभक्ती या घराण्यात केली जाते. विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याने श्री विठ्ठलाची मूर्ती पंढरपूरहून आपल्या राजधानीत नेली होती. ती पुन्हा श्री संत भानुदास महाराज यांनी परत आणली. अर्थात, श्री विठ्ठलप्रेम हे परंपरेत मुरलेले आहे. तसे पाहिले तर सुर्यनारायनाची उपासना करणारे हे घर आहे; परंतु ओढा मात्र श्री विठ्ठल भक्तीकडे असल्याचे जाणवते. नाथ महाराजांचे गुरु हे श्री संत जनार्दन स्वामी होय. इ.स.१५०४ ते १५७५ हा स्वामींचा काळ होय. स्वामींचा जन्म फाल्गुन वद्य षष्ठीचा मानला जातो. स्वामींचा अनुग्रह व समाधी याच दिवशी मानली जाते. षष्ठीचा उत्सव नाथ महाराज यांनीच सुरु केला आणि याच दिवशी नाथ महाराज गंगार्पण झाले. नाथ महाराजांचा काळ इ.स.१५३३ ते १५९९ असा मानला जातो.

यावेळी कृष्णा महाराज शास्त्रीजींनी भगवानगडाच्या दिंडीबद्दल बोलताना सांगितले की, नाथषष्ठीला मराठवाड्यातून पहिली दिंडी ही श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेली आहे. तेव्हापासून श्री क्षेत्र भगवानगडाच्या दिंडीला नाथपरंपरेमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजही शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांच्या समाधी सोहळ्याच्या कीर्तनामध्ये पहिल्या चालीचा मान हा भगवानगडालाच दिला जातो. वै.श्री संत भगवानबाबांपासून चालू असलेली ही परंपरा वै.गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराजांनी तंतोतंत पाळली.

# शब्दांच्या कुंचल्यातून साधं सरळ ज्ञान यश – किशोर गांधी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्टिस्ट ज्ञानेश शिंदे यांनी त्यांच्या जगण्यातून आलेले अनुभव, निरीक्षण यांना साधं सरळ या पुस्तकातून शब्दबद्ध केले आहेत. ते अतिशय कल्पक कलाकार आहेत. शब्दांच्या कुंचल्यातून त्यांनी अतिशय सुंदर आणि भावस्पर्शी साधं सरळ पुस्तकाची निर्मिती केली आहे. हे पुस्तक सर्वंच नवोदित आर्टिस्टसाठी अनमोल मार्गदर्शक ठरेल. कारण यात अनुभव आणि भावनांचा संगम आहे असे प्रतिपादन दिशान ॲडचे संचालक किशोर गांधी यांनी केले.

नगरमधील प्रसिद्ध आर्टिस्ट ज्ञानेश शिंदे यांनी शब्दबद्ध केलेल्या साधं सरळ या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच नेवासा येथे संत ज्ञानेश्वरांच्या पैसा खांबाच्या साक्षीने झाले. याबद्दल ज्ञानेश शिंदे यांचा दिशान ॲडचे संचालक किशोर गांधी यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अनामिका पब्लिसिटीचे प्रमोद गांधी (पीटु), ॲडव्हर्टायझिंग असोसिएशनचे अध्यक्ष गुलशन अरोरा आदी उपस्थित होते.

कॅलिग्राफीच्या माध्यमातून छोटे छोटे सुविचार या पुस्तकात आहेत ते प्रेरणादायी ठरेल. ज्ञानेश कुमार शिंदे यांनी दर रविवारी चला वाचुया हा वाचन संस्कृतीला चालना देणारा हॉबी. क्लब हा स्तुत्य उपक्रम चालू केला आहे.

जाहिरात क्षेत्र सृजनशीलता आणि नाविन्यपूर्ण कल्पकतेला वाव देते यातून मिळणारा आनंद मोलाचा असतो. याचा अनुभव नवीन आर्टिस्टसनी जरूर घेऊन करिअर घडवावे असे आवाहन किशोर गांधी यांनी केले.

ज्ञानेश शिंदे म्हणाले, आयुष्य जगताना आलेल्या अनुभवातून साधं सरळ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. आर्टिस्ट म्हणून काम करताना अनेकांचे मोलाचे सहकार्य लाभले. किशोर गांधी, प्रमोद गांधी यांनी कायम पाठबळ व प्रोत्साहन दिले. जाहिरात डिझाईनची खूप कामे त्यांनी विश्वासाने दिली.. वेळोवेळी मार्गदर्शन केले. यातून अनुभव मिळत गेला आणि शिकायलाही मिळाले. आज त्यांनी केलेला सन्मान आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा देणारा आहे..

# सलगड्यांचे दर दीड ते दोन लाखांवर; शेतकऱ्यांसमोर नवे आर्थिक आव्हान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** गुढीपाडवा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून ग्रामीण भागात या सणापासून नवीन वर्षाची सुरुवात होत असते. या दिवशी व्यापारी नवीन व्यवसायाला प्रारंभ करतात, तर शेतकरीही नवीन सलगडी नेमून शेतीच्या कामाला सुरुवात करण्याची परंपरा पाळतात.

मात्र यंदा वाढलेल्या महागाईचा परिणाम सलगड्यांच्या मानधनावर दिसून येत आहे. पूर्वी वार्षिक ६० ते ७० हजार रुपये मानधनावर काम करणाऱ्या सलगड्यांचे दर आता थेट दीड लाख ते दोन लाख रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. मजुरांची कमतरता आणि वाढती मागणी यामुळे दरात मोठी वाढ झाल्याचे शेतकरी सांगत आहेत.

पैठण तालुक्यातील अनेक भागांमध्ये सिंचनाची सुविधा असल्याने ऊस, भाजीपाला तसेच बागायती शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामुळे शेतीमधील विविध कामांसाठी सलगड्यांची गरज वाढली आहे. आधुनिक शेतीत ट्रॅक्टरचा वापर वाढला असला तरी ग्रामीण भागात अजूनही बैलजोडीच्या सहाय्याने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे अशा शेतकऱ्यांकडून सलगड्यांना प्राधान्य दिले जात आहे. गेल्या काही वर्षांतील दुष्काळी परिस्थिती, वाढती महागाई आणि मजुरांची घटती उपलब्धता यामुळे सलगड्यांचे मानधन सातत्याने वाढत आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांसमोर शेती व्यवस्थापनाचे नवे आर्थिक आव्हान उभे राहिले आहे.

# तवली-ठाकरवस्ती ते दरेकर वस्ती रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील म्हसोबा झाप–कन्हेर येथे आमदार काशिनाथ दाते सरांच्या स्थानिक विकास निधीतून मंजूर झालेल्या तवली– ठाकरवस्ती ते दरेकर वस्ती रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरण कामाचे भूमिपूजन डॉ. प्रदीप दाते यांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या रस्त्यासाठी १० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजुरी मिळाल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



सदर रस्ता पूर्ण झाल्यानंतर स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीस मोठी सोय होणार असून शेतकरी, विद्यार्थी तसेच कामानिमित्त ये–जा करणाऱ्या ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः पावसाळ्यात होणाऱ्या अडचणी कमी होऊन गावकुसातील वस्तीपर्यंत सहज वाहतूक होणार असल्याने ग्रामस्थांनी या विकासकामाचे स्वागत करत आमदार दाते सरांचे आभार मानले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रदीप दाते म्हणाले की, शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेप्रती आमदार काशिनाथ दाते सरांना असलेली आत्मीयता आणि जिव्हाळा हा मतदारसंघाच्या विकासाचा खरा पाया आहे. जोपर्यंत सर मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत, तोपर्यंत सामान्य माणसाला न्याय मिळत राहील याबाबत मला अजिबात शंका नाही.

सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांना न्याय मिळावा यासाठी आमदार दाते दर सोमवारी पारनेर येथे आणि शुक्रवारी नगर येथील संपर्क कार्यालयात दिवसभर नागरिकांच्या भेटीसाठी उपलब्ध राहतात, असेही त्यांनी सांगितले. मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यातून आशा घेऊन आलेला प्रत्येक नागरिक समाधानी होऊन परत जावा, हा त्यांचा कायमचा अट्टाहास असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या प्रसंगी रंगनाथ दाते, महादू शेठ आहेर, पोपट आहेर, सुखदेव आहेर, मारुती दरेकर, राजेंद्र भालके, संतोष जाधव, बबन दरेकर, सुभाष आहेर, चंदुशेठ दरेकर, प्रकाश रोहकले, अमोल दरेकर, दादू दरेकर, हरीभाऊ दाते, सुनील पवार, महेंद्र पवार, आदिनाथ रोहकले, महेंद्र रोहकले आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतीदिनानिमित्त नागरदेवळे येथे मोफत नेत्रतपासणी शिबीर

### फिनिक्स सोशल फाऊंडेशनचा सामाजिक उपक्रम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनाच्या पार्श्वभूमीवर फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नगर तालुक्यातील नागरदेवळे येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजातील गरजू नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला महिलांसह ज्येष्ठ नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ३१७ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ६७ गरजू रुग्णांवर दोन टप्प्यांत मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी ह.भ.प. नाना महाराज रासकर, विलास शिंदे, आप्पा काळे, रवी ससाणे, अथर्व लोटके यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना जालिंदर बोरुडे म्हणाले की, स्त्री शिक्षणाची क्रांती घडवून महिलांना सन्मान आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महान कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्री सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा झाला. तसेच शेतकरी व बहुजन समाजाच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून महात्मा ज्योतिराव फुले यांनी पुरोगामी विचार मांडले आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली. या महान वारशाला पुढे नेत वंचित घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचे काम फिनिक्स सोशल फाऊंडेशन करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार – रामदास फुले

### नेप्ती विभाग अध्यक्षपदी रामदास फुले तर नागरदेवळे विभाग अध्यक्षपदी संजय ताजने यांची नियुक्ती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रतिनिधी –सकल माळी समाज ट्रस्टच्या वतीने संघटन बळकट करण्याच्या उद्देशाने नेप्ती व नागरदेवळे विभागांसाठी नवीन अध्यक्षांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नेप्ती विभाग अध्यक्षपदी नगर तालुक्यातील नेप्ती येथील सामाजिक कार्यकर्ते रामदास विठोबा फुले यांचा तीस वर्षाच्या सामाजिक कार्याचा विचार करून त्यांची तर नागरदेवळे विभाग अध्यक्षपदी श्री संजय ताजने यांची नियुक्ती करण्यात आली. या प्रसंगी ट्रस्टच्या वतीने दोन्ही मान्यवरांचा मोठ्या दिमाखात शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.




कार्यक्रमात बोलताना सकल माळी समाज ट्रस्टचे उपाध्यक्ष श्री बाळासाहेब भुजबळ यांनी सांगितले की, समाजाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी विभागीय स्तरावर समाजातील सक्रिय व समाजकार्याची आवड असलेल्या व्यक्तींना जबाबदाऱ्या दिल्या जात आहेत. समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज असून त्यासाठी ट्रस्ट सातत्याने कार्यरत राहील.

यावेळी नेप्ती विभागाचे नवनियुक्त अध्यक्ष श्री रामदास फुले म्हणाले की, समाजाने माझ्यावर दाखविलेला विश्वास मी नक्कीच सार्थ ठरविण्याचा प्रयत्न करीन. या आधीही विविध पदाच्या माध्यमातून मी अनेक सामाजिक कार्य केली आहेत . समाजातील तरुणांना एकत्र करून सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येईल. पुढे बोलताना फुले यांनी सांगितले की, समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याचा माझा प्रयत्न असेल.

# लाड–पागे समितीनुसार नियुक्त मनपा कर्मचाऱ्यांना पतसंस्थेकडून कर्जसुविधा

### १२ मार्चपासून अर्ज स्वीकृती; पात्र कर्मचाऱ्यांनी लाभ घ्यावा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका मधील लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित यांनी कर्जसुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ही माहिती संस्थेचे चेअरमन विजय कोतकर यांनी दिली.

लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी वैयक्तिक व कौटुंबिक आर्थिक अडचणीमुळे पतसंस्थेकडे कर्जासाठी मागणी केली होती. त्याची दखल घेत पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत संबंधित कर्मचाऱ्यांना संस्थेचे सभासद करून घेण्याचा व संस्थेच्या नियम व अटींच्या अधीन राहून त्यांना आवश्यकतेनुसार कर्जपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर कर्मचाऱ्यांकडून सभासदत्वासाठी १२ मार्च २०२६ पासून अर्ज स्वीकारले जाणार आहेत. अर्ज मंजूर झाल्यानंतर चेअरमन यांच्या अंतिम मंजुरीनंतर पात्र कर्मचाऱ्यांना कर्ज अदा करण्यात येणार आहे.यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी शाळा सोडल्याचा दाखला, नियुक्ती आदेशाची झेरॉक्स प्रत, पॅनकार्ड, आधारकार्ड, दोन छायाचित्रे तसेच पगाराचा दाखला आदी आवश्यक कागदपत्रांसह पतसंस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधावा व आवश्यकतेनुसार कर्जसुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन चेअरमन विजय कोतकर तसेच संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### डिस्ट्रीक्ट रोटरॅक्टपदी ॲड. सत्यजीत कराळे पाटील

अहिल्यानगर - रोटरॅक्ट डिक्ट्रिक्ट ३१३१ मध्ये



पीएचएफ रोट. ॲड. सत्यजीत शिवाजीराव कराळे पाचील यांची डिस्ट्रिक्ट रोटरॅक्ट रिप्रेझेंटेटिव्ह नॉमिनी म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील रोटरॅक्टर्समध्ये उत्साहाचे वातावरण असून, अनेक सदस्य या क्षणाचे वर्णन सत्यमेव जयते - सत्याचाच विजय होतो, असा शब्दात करत आहेत.सत्यजीत कराळे पाटील यांचा रोटरॅक्टमधील प्रवास २०१५ साली रोटरॅक्ट क्लब ऑफ मराठवाडा मित्र मंडळ, पुणे, कोथरूड या क्लबचे चार्टर सदस्य म्हणून सुरू झाला. सेवाभावातून सुरू झालेला हा प्रवास गेल्या १० वर्षांत नेतृत्व, समर्पण आणि कार्याच्या विविध टप्प्यांतून अधिक भक्कम झाला. २०१९-२० या रोटरी वर्षात अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना त्यांच्या क्लबने मोठ्या संख्येने सेवा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केले. समाजावर प्रत्यक्ष परिणाम करणारे उपक्रम राबविणे हेच खरे नेतृत्व असल्याचा त्यांचा विश्वास या कामातून दिसून येतो. सत्यजित यांच्या उपक्रमांपैकी प्रोजेक्ट न्याय संहिता हा विशेष उल्लेखनीय उपक्रम ठरला आहे.

### शहरात मोफत होमिओपॅथीक आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



अहिल्यानगर- यशोदा लंके फाऊंडेशन व हॉलिस्टिक क्लासिकल होमिओपॅथी क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मोफत होमिओपॅथीक आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून अनेक रुग्णांनी आपली तपासणी करून घेत औषधोपचाराचा लाभ घेतला. खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन पीआरएम सॉफ्टवेअर कंपनीच्या सीईओ सुमन कुरेल यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरामध्ये होमिओपॅथी क्लिनिकचे संचालक डॉ. प्रमोद लंके यांनी जुनाट सर्दी, दमा, संधिवात, जुनाट डोकेदुखी, मासिक पाळीचे विकार, मुतखडा, पोटाचे विकार आदी विविध जटिल व जुनाट आजारांवर रुग्णांची तपासणी केली. रुग्णांची सविस्तर माहिती घेऊन त्यांना आवश्यक त्या होमिओपॅथीक औषधोपचाराचे मार्गदर्शनही करण्यात आले. शिबिरामध्ये डॉ. प्रियंका धाकतोडे, डॉ. ऋतुजा लांबे, डॉ. तेजस्विनी इंगोले, डॉ. संकेत लांडे यांनी देखील रुग्णांची तपासणी केली. यावेळी बोलताना डॉ. प्रमोद लंके म्हणाले की, अनेक आजारांचे मूळ कारण शोधून त्यावर उपचार करण्याची क्षमता होमिओपॅथी शास्त्रात आहे. त्यामुळे आजार मुळापासून नष्ट करण्यासाठी होमिओपॅथीचा प्रभावी उपयोग होत आहे. जगभरातील डॉक्टरांचे होमिओपॅथीकडे आकर्षण वाढत असून अनेक दिग्गज डॉक्टर देखील या पद्धतीने रुग्णांवर उपचार करत आहेत. दुर्धर व जुनाट आजारांवर होमिओपॅथीचा चांगला परिणाम दिसून येत असल्याने परदेशातील नागरिक देखील मोठ्या प्रमाणावर या उपचारपद्धतीकडे वळत असल्याचे त्यांनी सांगितले. शिबिराचे उद्घाटक सुमन कुरेल यांनी स्वतःचा अनुभव सांगताना सांगितले की, होमिओपॅथीचे औषधोपचार घेतल्यानंतर त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल झाला. उपचारापूर्वी सविस्तर समुपदेशन झाल्यामुळे मनातील नकारात्मकता कमी झाली व सकारात्मक दृष्टीकोन तयार झाला. त्यानंतर औषधोपचारामुळे आरोग्य सुधारत गेले आणि जीवनातील नैराश्यही कमी झाले. पुढे सुरू असलेली ॲलोपॅथीची औषधेही बंद झाली. होमिओपॅथीच्या माध्यमातून मनुष्य निरोगी आणि संतुलित जीवन जगू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात महिला सर्व क्षेत्रात आघाडीवर - महापौर ज्योतीताई गाडे

**जागतिक महिला दिनानिमित्त माजी सभापती पुष्पाताई बोरुडे यांच्या वतीने महिला मेळावा, दुर्लक्षित घटकातील आदर्श महिला पुरस्कार वितरण सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न | माजी सभापती पुष्पाताई बोरुडे यांचा स्तुत्य उपक्रम; महिलांचा उत्स्फूर्त सहभाग**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक महिला दिनानिमित्त बोरुडे मळा येथे माजी सभापती तथा नगरसेविका पुष्पाताई बोरुडे यांच्या वतीने महिला मेळावा, दुर्लक्षित घटकातील आदर्श महिला पुरस्कार वितरण सोहळा तसेच लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, आजच्या काळात महिला केवळ चूल आणि मूल यापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. शिक्षणाच्या बळावर त्या विविध क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे काम करत आहेत आणि कुटुंबाचा सांभाळ करत सुसंस्कृत पिढी घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही करत आहेत. २१ व्या शतकातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर दिसत आहेत. गरीब कुटुंबातील महिलांनी घरगुती व्यवसायाच्या माध्यमातून आपला वेगळा ठसा उमटवला असून अशा महिलांचा सन्मान करण्याचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

त्या पुढे म्हणाल्या की, बोरुडे कुटुंबीयांनी



प्रभागातील नागरिकांना सोबत घेऊन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक तसेच विकासकामांचे उपक्रम राबविले आहेत. महिलांना एकत्र आणून त्यांचा सन्मान करणे आणि लहान मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही अत्यंत स्तुत्य बाब आहे.

या कार्यक्रमास मनपा महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, नगरसेविका रोशनी त्रिंबके सुप्रिया जाधव,तसेच नानासाहेब बेल्हेकर, किरण गवळी, प्रकाश इथापे, कविता अभंग, जयश्री कुटे, अश्विनी बोरुडे, हिराबाई बोरुडे, प्रियंका पाटील आदींसह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी माजी सभापती पुष्पाताई बोरुडे म्हणाल्या की, दरवर्षीप्रमाणे यंदाही जागतिक महिला दिनानिमित्त प्रभागातील महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावर्षी दुर्लक्षित घटकातील महिलांनी घरगुती व्यवसायातून स्वतःचे कर्तृत्व सिद्ध केले आहे. अशा महिलांचा आदर्श माता म्हणून पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या महिलांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. तसेच लहान मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या चिमुकल्यांना बक्षिसे देण्यात आली. महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करून सायकल, मिक्सर, पैठणी साडी आदी आकर्षक बक्षिसे देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. महिला दिनाच्या निमित्ताने महिलांनी एकत्र येत संवाद साधल्याने समाजात स्नेहबंध आणि आपुलकी वाढण्यास मदत होत असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रभागातील नागरिक हे बोरुडे कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रभागात बचत गटांचे जाळे उभे करून त्यांच्या हाताला काम उपलब्ध करून दिले असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन जयश्री कुटे यांनी मानले.

## अहिल्यानगरमध्ये किसनगिरीबाबांची पुण्यतिथी सोहळा संपन्न

**पारायणाने मिळाली आध्यात्मिक ऊर्जा, तर भजनाने मंत्रमुग्ध झाले भाविक**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरातील संत किसनगिरीनगर येथील गुरु दत्त भक्तिधाम येथे श्री समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबांचा पुण्यतिथी सोहळा मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेच्या वातावरणात साजरा झाला. ज्ञानोबा–तुकाराम आणि सद्गुरू किसनगिरीबाबांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.देवगड संस्थानचे प्रातःस्मरणीय प.पू. गुरुवर्य भास्करगिरी महाराज आणि स्वामी श्री प्रकाशानगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेतून साकारलेल्या या भक्तिधामात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती.

सोहळ्याची सुरुवात पहाटे मंगलमय वातावरणात श्रींच्या अभिषेकाने आणि नित्यपूजेने झाली. त्यानंतर भाविकांनी 'श्री किसनगिरी विजय' या ग्रंथाचे मनोभावे सामुदायिक पारायण केले. या ग्रंथवाचनाने उपस्थित भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा मिळाली. दुपारी आयोजित महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने घेतला.


कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे रात्री ९ ते ११ या वेळेत झालेली 'गुरुभक्ती' भजन संध्या. श्री. गोरक्षनाथ दुतारे महाराज यांच्या सुश्राव्य भजनांनी आणि उपस्थितीने भाविक मंत्रमुग्ध झाले. भक्ती आणि सुरांच्या या संगमामुळे वातावरणात एक वेगळंच चैतन्य निर्माण झाले होते.या सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेटी देऊन दर्शन घेतले. यामध्ये महापौर ज्योती गाडे, माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप, महिला बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, सौ. किरण बारस्कर, जालिंदर बोरुडे .यांच्यासह नगर भक्त मंडळा कडून , सत्कार करण्यात आला.नंतर महाप्रसाद वाटप करण्यात आला.यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबा नगर भक्त मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या सोहळ्याचे नियोजन केले होते.

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात अँटी रॅगिंग या विषयावर कार्यशाळा संपन्न

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**श्रीगोंदा–** रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात अँटी रॅगिंग उपाय व वैशिष्ट्ये या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून ॲड. विजया घोडके उपस्थित होत्या. याप्रसंगी महिलांच्या कायद्याविषयी त्यांनी विचार व्यक्त केले. रॅगिंग ॲक्ट संदर्भात माहिती दिली. त्या म्हणाल्या की, महिलांचा सन्मान करूया. मुलींनी तरुणपणात भावनांच्या आहारी जाऊ नये. महाविद्यालयीन युवक युवतींनी शिक्षणाच्या माध्यमातून आपण आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला पाहिजे. महाविद्यालयात कोणीही कोणाला त्रास देऊ नये. प्रत्येक विद्यार्थ्याने एकमेकाला सांभाळले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे होते. ते म्हणाले की, रॅगिंग ही एक गंभीर समस्या असून शैक्षणिक संस्थांमध्ये तिला बंदी आहे. कोणीही कोणाचा शरीरिक व



मानसिक छळ करू नये. महाविद्यालयीन जीवन हे आपले व्यक्तिमत्व घडवण्यासाठी असते. महाविद्यालयात येऊन ज्ञानसंपन्न बना, असे ते म्हणाले. समन्वयक डॉ. हरिभाऊ वाघीरे यांनी पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. राहुल गायकवाड, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रियांका म्हस्के यांनी केले. आभार डॉ . अनुराधा ताटे यांनी मानले.

## न्यू लॉ कॉलेज मध्ये १४ मार्च रोजी कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मार्गदर्शनाखाली येथील न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर यांच्या वतीने गेल्या अठरा वर्षांपासून आयोजित करण्यात येणारी राज्यभरात नामांकित कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. राज्यभरातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थी या स्पर्धेची उत्सुकतेने वाट पाहत असतात.

या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ. सुभाष लांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील असणार आहेत. स्पर्धेचे बक्षीस वितरण त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता होणार असून संस्थेचे अध्यक्ष श्री. रामचंद्र दरे यांच्या हस्ते होईल. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर राहणार आहेत.

वक्तृत्व स्पर्धा शनिवार दिनांक १४ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता सुरू होणार असून स्पर्धे साठी पुढील विषय निश्चित करण्यात आले आहेत १) लोकशाहीचा आधारस्तंभ : समाजमाध्यमे २) कृत्रिम बुद्धिमत्ता व मानवी भवितव्य ३) कायदे समाजासाठी हवेत की समाज कायद्यांसाठी हवा : भारतीय समाजजीवनातील वास्तव ४) आत्मनिर्भर भारत आणि महिला सक्षमीकरण ५) राष्ट्रनिर्माणात युवकांची भूमिका या वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयांनी दूरध्वनी क्र. (०२४१) २३२४०७४ किंवा स्पर्धेचे समन्वयक प्रा. डॉ. रामेश्वर दसुंगे (मो. ७२४९७४०५७५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी केले आहे.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त भाजप प्रदेश कार्यालयात अभिवादन



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुंबई येथील भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस आमदार मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार सीमाताई हिरे, भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर, गणेश रांधवने, राहुल नांगरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांनी समाजासाठी केलेल्या कार्याची आठवण करून त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

आमदार मोनिकाताई राजळे म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांनी समाजातील स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी मोठा संघर्ष केला. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे महिलांना शिक्षणासह समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त झाले. त्यांनी सुरू केलेली शिक्षणाची क्रांती आजही समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात समतेच्या विचारांवर आधारित विकासकामे सुरू आहेत. सर्व समाजघटकांना सोबत घेऊन राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सरकार कटिबद्ध आहे. विशेषतः मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देत महिलांसाठी विविध योजना राबविल्या जात असून, महिलांचे सशक्तीकरण हा सरकारचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

भाजपच्या माध्यमातून विकसित महाराष्ट्राच्या दिशेने राज्याची वाटचाल सुरू असून, प्रत्येक समाजघटकाच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले जात आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सकारात्मक बदल घडविण्याचे कार्य सरकार करत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले या केवळ पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर त्या सामाजिक क्रांतीच्या अग्रदूत होत्या. त्यांनी समाजातील अज्ञान, अन्याय आणि भेदभावाविरुद्ध आवाज उठवून शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या कार्यामुळे आज समाजातील महिलांना शिक्षण, स्वाभिमान आणि समानतेचा हक्क मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले.

# पदमशाली समाजातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देणार - महापौर सौ. ज्योतीताई गाडे

**पदमशाली समाजाच्या वतीने महापौर उपमहापौर यांचा सन्मान**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर पदमशाली समाजाच्या पंचकमिटी ज्ञाती समाज व मार्कंडेय देवस्थान कमिटीच्या वतीने अहिल्यानगर चे नवनिर्वाचित महापौर सौ. ज्योतीताई गाडे व उपमहापौर ऍड. धनंजय जाधव यांचा सन्मान सोहळ्याचे कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मा. नगरसेवक व पंचकमिटी चे माजी अध्यक्ष प्रकाश येनगंदुल होते या वेळी मा. नगरसेविका सुप्रिया जाधव, पंचकमिटी चे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा, देवस्थान चे अध्यक्ष गणेश विद्ये, सी ए सुनंदा रच्चा, उद्योजक शरद मडूर, गिरीष चिट्टा, मा. आकाशवाणी प्रमुख राजेंद्र दासरी, मनपा चे अधिकारी अंबादास साळी साहेब, स्वाती सिरसूल आदी उपस्थित होते.

या वेळी सत्काराला उत्तर देतांना महापौर म्हणाले आज पद्मशाली समाजाच्या वतीने माझा सन्मान होतो आहे हा माझा एक उचित सन्मान असून हा समाज प्रामाणिक व कष्टाळू असल्याचे मी ऐकले होते परंतु आज मी स्वतः अनुभवलेले आहे. या समाजातील महिलांना रोजगार मिळण्यासाठी मी नक्कीच पालिकेच्या मार्फत प्रयत्न करून रोजगार उपलब्ध करून देईल.

या वेळी उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले आज माझा हा सन्मान माझ्या परिवाराने केलेला आहे,पदमशाली समाज आणि आमचे जाधव कुटुंबाचे नाते हे माझ्या आजोबा पासून असून गेले ७० वर्षांपासून आमच्या कुटुंबाचे समाजा बरोबर ऋणानुबंध आहेत आणि त्याची फेड आम्ही करू शकत नाही, परंतु मी आज उपमहापौर असून या पदाच्या माध्यमातून समाजासाठी भरीव कार्य करण्याचा माझा मानस आहे या साठी पदमशाली समाजाने मला संधी दयावी असे जाधव म्हणाले.

पदमशाली समाजाच्या वतीने महापौर व उपमहापौर यांचे शाल श्रीफळ व त्यांचे स्थईलचित्र असलेली प्रतिमा भेट देण्यात आली. या कार्यक्रमात सी ए सुनंदा रच्चा यांची आय सी ए आय अहिल्यानगर शाखेच्या खजिनदार पदी नियुक्ती झाल्या बद्दल सन्मान करण्यात आला तर सौ. दिप्ती द्यावनपेल्ली हे अहिल्यानगर केंद्रा मधून संगीत विशारद गायनमध्ये प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आले.या वेळी मा. नगरसेविका सुप्रिया जाधव, उद्योजक अमोल गाडे, सी ए सुनंदा रच्चा, सौ. दिप्ती द्यावनपेल्ली, सौ.लीना रच्चा, गणेश येनगंदूल, दत्तात्रय जोग , श्रीनिवास येल्लाराम सर आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

# स्वतंत्र विचार आणि व्यक्तिमत्व घडविण्यात वाचनालयाचे योगदान महत्त्वपूर्ण

## अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात महिला दिन महिला वाचकांचा मुक्त संवाद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाज व्यवस्थेची स्त्री ची चाकोरीबद्ध जीवनशैली भेदीत स्वतंत्र विचार आणि त्यातून स्वाभिमानी व्यक्तिमत्व घडवण्यात अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वाचन संस्कृतीचा मोठा वाटा असल्याची एकमुखी सूर उमटला तो महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी.

अहिल्यानगर जिल्हा वाचलाच्या वतीने आयोजित महिलादिन संवाद व सन्मान सोहळ्याप्रसंगी विविध क्षेत्रातील महिला वाचक सदस्य यांनी संवाद साधला. याप्रसंगी वाचनालयाच्या संचालिका व लेखिका प्रा.मेधा काळे, प्रा. ज्योती कुलकर्णी ,शिल्पा रसाळ ,खजिनदार तनवीर खान ,कवी चंद्रकांत पालवे, वाचक सुवर्णा वैद्य ,माधुरी बालटे, सारिका कासट,वाचनालयाच्या पल्लवी कुक्कडवाल ,वर्षा जोशी, पुनम गायकवाड ,ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल आदींसह असंख्य महिला वाचक सदस्य उपस्थित होत्या .

प्रा. सुवर्णा वैद्य यांनी यावेळी बोलताना ''अगदी शालेय जीवनापासून वाचनालय आणि हाती आलेली पुस्तके यांनी मला एक स्वतंत्र विचार करण्याची प्रेरणा दिली.सातत्याने सुरू राहिलेल्या वाचनातून जीवन काळात गेले व स्वाभिमानाने जीवनात उभे राहता आल्याचे प्रतिपादन केले. सौ. माधुरी बालटे यांनी बोलताना ''वाचनालयाचा समृद्ध वारसा व तो वाचकापर्यंत जाण्यासाठी सेवक वर्गाची सातत्याने चालू असलेली धडपड या दोन्ही मधून सुदृढ समाज निर्मिती व संवेदनशील वाचक निर्माण झाल्याचे कार्य अमूल्य असल्याचे सांगितले .

सौ.स्नेहल शहा यांनी ''वाचनालयाच्या वाचन चळवळीत मी घडत असताना घरीही हा वारसा मुलांमध्ये आपसूकपणे आला. मोबाईल ,टीव्ही पासून थोडे अलिप्त राहून स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जडणघडण मुला-मुलींमध्ये झाली. आज याच वाचनातून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.यासाठी वाचनालयाची व पुस्तकांची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे सांगितले.

यावेळी सारिका कासट, प्रा. मेधा काळे, प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, पल्लवी कुक्कडवाल, कवि चंद्रकांत पालवे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

मान्यवरांच्या हस्ते महिला सदस्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा रसाळ, प्रास्ताविक ज्योती कुलकर्णी ,आभार पल्लवी कुक्कडवाल यांनी मानले.

याप्रसंगी सौ.द्वारका आव्हाड ,नंदप्रकाश शिंदे, सौ.अरुंधती नगरकर, सौ.स्नेहल शहा, कृती पटेल,मृण्मयी ऋषी, सौ.ममता खरारे,इशा पल्लोड आदी उपस्थित होत्या.कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा वाचनालयातील कर्मचारी यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

# रामदास फुले यांचे कार्य कौतुकास्पद - उपमहापौर धनंजय जाधव

## नेप्तीचे रामदास फुले यांचा उपमहापौर धनंजय जाधव हस्ते सन्मान करून सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांची सकल माळी समाज ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने समाजाचे संघटन अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने नेप्ती विभागाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

अहिल्यानगर येथील सकल माळी समाज ट्रस्टच्या बैठकीत त्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.त्यांच्या सामाजिक कार्याचा विचार करून त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आल्याने महापालिकेच्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते रामदास फुले यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, समाजाच्या प्रगतीसाठी संघटित शक्ती अत्यंत महत्त्वाची असते. समाजातील कार्यकर्ते एकत्र आले आणि संघटनात्मक पातळीवर काम केले तर समाजातील अनेक प्रश्न सोडविणे सोपे होते. सकल माळी समाज ट्रस्टने समाजाला एकत्र आणण्याचे आणि समाजातील कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या देण्याचे जे कार्य हाती घेतले आहे, ते निश्चितच कौतुकास्पद असून समाजाच्या प्रगतीसाठी ते मोलाचे ठरेल.

जाधव पुढे म्हणाले की, समाजातील तरुणांनी सामाजिक कार्यात पुढाकार घेतला पाहिजे.रामदास फुले यांच्यासारख्या कार्यकर्त्यांना जबाबदारी मिळाल्याने समाजकार्याला अधिक गती मिळेल.समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधींसोबत समन्वय ठेवून काम केल्यास विकासाची नवी दिशा निर्माण होऊ शकते. आगामी काळातही समाजाच्या हितासाठी अशा संघटनात्मक उपक्रमांना महापालिकेचे सहकार्य राहील. रामदास फुले यांचे कार्य कौतुकास्पद असून त्यांनी राजकारणापेक्षा समाजकार्याला अधिक प्राधान्य दिले असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले. यावेळी सकल माळी समाज ट्रस्टचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी सांगितले की, समाजाचे संघटन बळकट करण्यासाठी विभागीय स्तरावर समाजातील समाजकार्याची आवड असलेल्या तरुणांना जबाबदाऱ्या दिल्या जात आहेत. समाजातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नांची गरज असून त्यासाठी ट्रस्ट सातत्याने कार्यरत राहणार आहे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन समाजहिताचे कार्य पुढे नेले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना नवनियुक्त अध्यक्ष रामदास विठोबा फुले यांनी सांगितले की, समाजाने दिलेल्या या जबाबदारीची जाणीव ठेवून आपण प्रामाणिकपणे काम करू. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून शिक्षण, सामाजिक एकजूट आणि समाजहिताच्या उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, नेप्तीचे माजी सरपंच अंबादास पुंड, सचिव राजेंद्र पडोळे, विश्वस्त विनोद पुंड, कोर कमिटी सदस्य अमोल भांबरकर, अनिल इवळे, रमेश चिपाडे, रोहित पठारे, बबन शिंदे, नितीन शिंदे, अनिल लोंढे,गणेश विद्ये आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माळीवाडा वेस पाडावी; महात्मा फुले प्रेमींच्या बैठकीत ठराव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माळीवाडा येथील नियोजित महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक व्हावे.ही सर्व समाजाची इच्छा आहे.या बैठकीला जिल्ह्यातील सर्व समाजाचे नेते उपस्थित आहेत.प्रशासनाने स्मारकाचे काम तातडीने सुरू करावे.स्मारकाचे काम भव्य दिव्य होण्यासाठी वेळ प्रसंगी माळीवाडा वेस पाडावी.असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

अहिल्यानगरच्या वैभवात भर टाकणाऱ्या क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे ऊर्जास्थान आपल्या शहरात उभे राहणार आहे. माळीवाडा (अहिल्यानगर) येथे या दोन्ही महापुरुषांचा भव्य पूर्णाकृती पुतळा आणि स्मारक उभारण्याच्या कामाला गती मिळावी आणि हे काम लवकरात लवकर सुरू व्हावे. यासाठी बंधन लॉंस येथे फुले दांपत्य स्मारक समितीच्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या मागणीचे निवेदन महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले.

याप्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले,उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,महात्मा फुले सावित्रीबाई फुले कृती समितीचे अध्यक्ष प्रा.माणिक विधाते,नगरसेवक सुरेश बनसोडे,भगवान फुलसौंदर,दत्ता गाडळकर,नगरसेविका गीतांजली काळे,शितल ढोणे, वर्षा सानप,सुजाता पडोळे,रूपाली दातरंगे,मंगल भुजबळ,शेंडी चे सरपंच प्रयागाताई लोंढे,मनोज ताठे, पद्मशाली समाजाचे नेते गणेश विद्ये,श्रीनिवास बौज्जा,महेंद्र बिज्जा, एडवोकेट राजेंद्र गाली, स्वकुळ साळी समाजाचे कृष्णा बागडे,कैकाडी समाजाचे अध्यक्ष विशाल माने,पारनेरचे ओबीसी नेते खंडु भुकन,

ओबीसी चे अध्यक्ष दिपक खेडकर,बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली मामा गायकवाड,अशोक फलके देवांग कोष्टी समाज, नाभिक समाजाचे अनिल निकम, सत्यशोधक समाजाचे ज्ञानदेव खराडे,म.फुले समता परिषदेचे अध्यक्ष ब्रीजेश ताठे, राजेंद्र ताठे,राजेंद्र पडोळे,पंडित खरपुडे,सुरेश तात्या आंबेकर, साहेबराव विधाते, अमित खामकर, संजय ताजणे, रामदास फुले, प्रकाश इवळे, रेणुका पुंड, बजरंग भुतारे, सुरेश कावळे, सुधीर पुंड,राजाराम चिपाडे, ज्ञानेश्वर रासकर, विनोद पुंड, अनिल इवळे, बजरंग भुतारे आदी उपस्थित होते.

सुरेश बनसोडे म्हणाले, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक व्हावे हे सर्व अहिल्या नगरकरांचे स्वप्न आहे. स्मारक होण्यासाठी काही अडचणी आहेत वेळप्रसंगी आंदोलन करू व त्या मार्गी लावू.वेशीच्या आडून जे काही लोक राजकारण करीत आहेत त्यांना समाजकंटक व देशद्रोही म्हणून घोषित करावे.

# कर्नल परबस् स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन थाटामाटात संपन्न

## 'स्पेक्ट्रम सात रंग' या संकल्पनेवर विद्यार्थ्यांच्या विविध सादरीकरणांनी रंगली संध्या



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील एकमेव आयसीएसई अभ्यासक्रमाची शाळा असलेल्या कर्नल परबस् स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन कॅव्हलरी सभागृह येथे नुकतेच मोठ्या उत्साहात व थाटामाटात संपन्न झाले. प्रमुख पाहुण्या डॉ. मीरा कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेच्या गीता परब मॅडम, कर्नल दिलीप परब सर, सनबीम्स आणि कर्नल परबस् स्कूलचे संस्थापक रिकीराज परब, मुख्याध्यापिका अर्पिता रननवरे तसेच सनबीम्सच्या प्रमुख भावना शिंगवी उपस्थित होत्या.

यावर्षीच्या कार्यक्रमाची संकल्पना 'स्पेक्ट्रम सात रंग' अशी होती. कार्यक्रमाची सुरुवात कर्नल परबस् स्कूलच्या शाळा गीताने करण्यात आली. सनबीम्सच्या रिदान अडसूरे आणि युगंधरा सुद्रिक या चिमुकल्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स्वानंदी कवडे हिने आभार प्रदर्शन केले, तर रंगभूषेचे काम पल्लवी आगरवाल यांनी पाहिले.

सनबीम्सच्या लहान मुलांनी भगवान विष्णूंचे सात अवतार तसेच विष्णू अवतारातील कृष्ण अवतारावर आधारित हुला हुप नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या दोन्ही सादरीकरणांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यानंतर इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. सृष्टीच्या निर्मितीचे सात दिवस, इंद्रधनुष्याचे सात रंग, शिक्षणातील सात स्तंभ, निसर्गातील सात घटक अशा विविध संकल्पनांमधून ''सात'' या अंकाचा महिमा प्रभावीपणे सादर करण्यात आला. शिवाजी महाराजांचे सात मावळे तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा हे सादरीकरण प्रेक्षकांसाठी डोळ्यांचे पारणे फेडणारे ठरले.

# अहिल्यानगरच्या लेकीची स्क्रॅप व्यवसायाची यशोगाथा

## कोमल साबळे यांचा राज्यस्तरीय यशस्वी उद्योजिका म्हणून पुणे येथे गौरव; महिला दिनानिमित्त सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** उद्योगक्षेत्रात महिलांनी पुढे येत समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी, याचे प्रेरणादायी उदाहरण अहिल्यानगर शहरातील कोमल नाना साबळे यांनी घालून दिले आहे. स्क्रॅपच्या व्यवसायात स्वतःची स्वतंत्र ब्रॅण्ड निर्माण करत त्यांनी अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जागतिक महिला दिनानिमित्त दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री (डिक्की) यांच्या वतीने त्यांचा पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात 'यशस्वी उद्योजिका' म्हणून सन्मान करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यात डिक्कीचे संस्थापक-अध्यक्ष पद्मश्री डॉ. मिलिंदजी कांबळे, सोशल फॉर सोशल एन्टरप्रिन्युअरशीप मुंबईच्या चेअरपर्सन डॉ. अर्चना सिंग, डिक्की महिला आघाडीच्या राष्ट्रीय प्रमुख सीमाताई कांबळे, डिक्की पश्चिम भारताचे अध्यक्ष संतोष कांबळे, भारत सरकारच्या एससी-एसटी हबचे राज्य समन्वयक रितेशजी रंगारी, डिक्की महिला आघाडी राज्य प्रमुख निवेदिता कांबळे, राज्य उपप्रमुख गीता पेडणेकर, नगर जिल्हा डिक्कीचे प्रमुख चंद्रकांत काळोखे आदी मान्यवर उपस्थित होते.

कोमल साबळे यांनी काही वर्षांपासून स्क्रॅप व्यवसायात सातत्याने मेहनत घेत स्वतःच्या फर्मची वेगळी ओळख निर्माण केली आहे. उद्योग उभारतानाच त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपल्या व्यवसायातून सुमारे १५ कष्टकरी महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे या महिलांना आर्थिक स्वावलंबनाचा आधार मिळाला आहे.

विशेष म्हणजे कोविडच्या कठीण काळातही त्यांनी आपल्या कामगारांना साथ देत त्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत केली. तसेच शासकीय आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देत त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा दिला. संकटकाळातही कामगारांच्या पाठीशी उभे राहण्याची त्यांची भूमिका लक्षात घेऊन डिक्कीच्या वतीने त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

# बालानगर परिसरात वाळू-मुरूम चोरीला ऊत महसूल यंत्रणेवर आश्रयाचा आरोप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** प्रतिनिधी तालुक्यातील बालानगर महसूल मंडळ परिसरात वाळू व मुरूम चोरीच्या घटना वाढत असल्याचे समोर येत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार काही ठिकाणी अवैधरित्या वाळू-मुरूम उपसा सुरू असून याकडे महसूल विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे.

गावकऱ्यांच्या माहितीनुसार काही वाळू-मुरूम वाहतूक करणाऱ्यांना महसूल विभागातील काही कर्मचाऱ्यांचा आश्रय मिळत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. त्यामुळे वाळू-मुरूम चोरी करणाऱ्यांचे दिवस सुगीचे झाल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, अवैध वाळू-मुरूम उपशामुळे शासनाचा महसूल बुडत असून पर्यावरणालाही फटका बसत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. याबाबत महसूल प्रशासनाने तातडीने कारवाई करून अवैध उत्खननाला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

(पान १ वरून)

## भाड्याच्या उत्पन्नावर आकारणी न करता क्षेत्रफळानुसार आकारणी करा

उद्योग धंदे, कंपन्या व्यवसाय हे अल्प प्रमाणात आहेत, तसेच कंपन्यामध्ये नोकरी करत असलेले व काही कर्मचारी यांना पेन्शन मिळत नसल्यामुळे हे मध्यमवर्गीय व व्यवसायीक वृद्धापकाळाचे उत्पन्नाचे साधन निर्माण होण्याकरीता कर्ज काढुन घर बांधतात यामधील काही भाग उत्पन्न मिळण्याकरीता भाड्याने देतात. तसेच शहरामध्ये ब-याच मालमत्ता धारकांचे उत्पन्न हे मोठ्या प्रमाणात भाड्यावर अवलंबून असल्याने त्यांचा उदरनिर्वाह त्यावर होत असतो. परंतू वरील घरपट्टी आकारणीचा अंदाज केलेले उदाहरण पाहिले असता उत्पन्नाच्या ५० टक्के उत्पन्न हे महानगरपालिका वसुल करत असल्याचे निदर्शनास येते. उरलेल्या ५० टक्के उत्पन्नात मालमत्ता धारकाला मिळालेल्या उत्पन्नातून लाईट बील, आयकर, मेन्टेनन्स, कर्ज हप्ता व इतर खर्च करणे त्याला शक्य होत नाही. त्याचप्रमाणे भाडेकरी हा वर्षभर राहिल याची खात्री नसते, तो जर सहा महिने राहिला तरी महानगरपालिका पुर्ण वर्षाच्या भाड्यावर आकारणी करत असल्याने मालमत्ता धारकास मिळालेले भाडे घरपट्टी पोटी संपुर्ण रक्कम भरावी लागते, त्यामुळे त्याला रुपयाही उत्पन्न मिळत नाही.

तरी ब-याच महानगरपालिकेमध्ये भाड्याचे उत्पन्नावर आकारणी होत नसल्याने महानगरपालिकेने मालमत्ता कराची आकारणी करताना ते इमारतीच्या क्षेत्रफळानुसार करावी. मालमत्ता धारकाच्या भाड्याने दिलेल्या रकमेवर करु नये, तसेच भाड्याचे दराने केलेली आकारणी रद्द करुन मालमत्ता धारकांना घरपट्टी भरण्यास परवडेल अशा पद्धतीने आकारणी करणेबाबत व संबंधीत एजन्सीला (मे. सि.ई. इन्फो सिस्टीम लि.) या रिव्हीजन पोटी रु.१५ कोटी ही किंमत भविष्यात महानगरपालिकेला द्यावी लागणार असून ती रक्कम जनतेच्या वसूल केलेल्या करातून द्यावी लागणार असून जनतेवर हा बोजा टाकण्याचे काम महानगरपालिका करत आहे. महानगरपालिकेची स्थायी समितीची विशेष सर्वसाधारण सभा घरपट्टी या विषयासाठी बोलविण्यात अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे यावेळी शिवसेना जिलहप्रमुख अनिल शिंदे ,शहर प्रमुख संभाजी कदम ,बाळासाहेब बोराटे ,दत्तात्रय कावरे ,सचिन जाधव ,संजय शेंडगे,अनिल लोखंडे ,नवनाथ कातोरे ,परेश लोखंडे ,काका शेळके ,प्रणव भोसले,अरुण झेंडे ,अभिजित अष्टेकर ,गणेशझिंजे ,केलास शिंदे ,विजय बोरुडे ,चेतन शिरसुल ,प्रताप गडाख ,अंगत महानवर ,यशराज खेरे आदी उपस्थित होते .

## ठाकरे शिवसेनेच्या वतीने स्व. अनिलभैय्या राठोड यांना जयंती दिनी अभिवादन

अनिलभैय्या शरीराने जरी आपल्यात नसले तरी त्यांचे विचार जिवंत राहण्याची गरज आहे. म्हणूनच शहरातील ठाकरे शिवसेना त्यांच्या विचारांवर काम करीत असून कायम या विचारांची जपणूक करण्यासाठी कटिबद्ध राहील, अशी भावना यावेळी शिवसैनिकांनी व्यक्त केली.

## छोट्या व्यावसायीकांना गॅस सिलेंडर तात्काळ मिळवून देण्याची मागणी

आले असल्याने त्याचा मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. त्यामुळे गॅसच्या किमती कमी करुन छोटया व्यावसायीकांना तात्काळ सिलेंडर उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशी मागणी भरत बोडखे, राजेश भाटिया, गणेश तोडमल, रिजवान शेख, आयेशा सय्यद, दिलीप घुले यांच्यासह आदींनी केली आहे.

## महिला नगरसेविकांनी प्रभागात जनजागृतीसाठी पुढाकार घ्यावा - महापौर ज्योतीताई गाडे

विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत आणि नागरिकांनी त्याचा लाभ घेणे गरजेचे आहे. आरोग्य सुविधा देण्याच्या बाबतीत आपली महापालिका राज्यात पाचव्या क्रमांकावर आहे. तसेच महापालिकेच्या माध्यमातून शहरात राबविण्यात आलेल्या डेंग्यू मुक्त अभियानामुळे रुग्णसंख्येमध्ये मोठी घट झाली आहे. . योग्य प्रचार-प्रसाराच्या माध्यमातून एचपीव्ही लसीकरणाची मोहीमही यशस्वी करण्यात येईल. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर यांनी या मोहिमेच्या दूत म्हणून काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, कर्करोग हा अत्यंत भयानक आजार असून महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. हा आजार होऊ नये यासाठी शासनाने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एचपीव्ही लस उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलींना ही लस देऊन त्यांचे आरोग्य सुदृढ व निरोगी ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले की, लस ही आजार होऊ नये म्हणून दिली जाते. पूर्वी पोलिओ आणि देवी यांसारख्या आजारांवर लस निर्माण झाल्यामुळे आज ते आजार जवळजवळ नष्ट झाले आहेत. त्याचप्रमाणे कॅन्सरमुक्त समाज घडवायचा असेल तर एचपीव्ही लस घेणे अत्यंत गरजेचे आहे. पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या मुलींना लस देऊन घ्यावी.

महापालिकेच्या आठ आरोग्य केंद्रांवर ही लस उपलब्ध असून आरोग्य विभागाचे कर्मचारी घरोघरी जाऊन लसीकरणाबाबत जनजागृती करणार आहेत. शहरासाठी एकूण ४ हजार लसी उपलब्ध होणार असून पहिल्या टप्प्यात १५०० मुलींना लस देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

## महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचा सत्कार

पतसंस्थेच्या माध्यमातून आरोग्य उपचारासाठीही मोफत मदत दिली जात असल्याने कर्मचाऱ्यांच्या आरोग्य समस्यांचे निदान होण्यास मदत होत आहे. संचालक मंडळाच्या या कार्याचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमात संस्थेचे चेअरमन विजय कोतकर म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नूतन महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचा पतसंस्थेच्या वतीने सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.